**ठळक बातम्या**

- समुद्र किनारे स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी घेण्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नागरिकांना आवाहन
- येत्या दोन महिन्यात देशातल्या २० नद्या एकमेकांशी जोडणार असल्याची केंद्रीय जलसंधारण मंत्री सी. आर. पाटील यांची माहिती
- अधिसभेची निवडणूक उद्याच घेण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे मुंबई विद्यापीठाला आदेश

**आणि**

- भारताविरुद्धच्या मालिकेतल्या पहिल्या कसोटी सामन्यात बांग्लादेशाच्या दुसऱ्या डावात ४ बाद १५८ धावा

**<><><><><>**

राज्याला ७२० किलोमीटर लांबीचे नैसर्गिक सौंदर्य लाभलेले अनेक समुद्रकिनारे लाभले आहेत. जगभरातले पर्यटक देखील स्वच्छ किनाऱ्यांना पसंती देतात. हे किनारे स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी आपली प्रत्येकाची आहे, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सांगितलं. मुंबईत जुहू चौपाटी समुद्रकिनारा स्वच्छता मोहिमेवेळी ते बोलत होते. या वेळी केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन उपस्थित होते.

आंतरराष्ट्रीय सागरी किनारा स्वच्छता दिनाच्या निमित्ताने आज गिरगाव चौपाटीवर वाळूशिल्पकार लक्ष्मी गौड यांनी वाळूशिल्प साकारत टाकाऊपासून टिकाऊचा संदेश दिला. स्वच्छता पंधरवड्याच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबईतल्या सहा विभागांमध्ये आज खारफुटी स्वच्छता मोहीम तसंच महापालिकेतर्फे प्लास्टिकमुक्त मार्केट ही मोहीम राबवण्यात आली. रत्नागिरी शहरातही भाट्ये गावातल्या समुद्रकिनाऱ्यावर आज स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. सांगली, मिरज आणि

कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आलं. या अभियानात सांगली- मिरज रस्त्यावरची २० ठिकाणं निश्चित करून ही स्वच्छता मोहीम राबवत सात टन कचरा संकलित केला.

<><><><><>

भविष्यातली पाण्याची कमतरता टाळण्यासाठी येत्या दोन महिन्यात देशातल्या २० नद्या एकमेकांशी जोडण्यात येणार असल्याचं केंद्रीय जलसंधारण मंत्री सी. आर. पाटील यांनी सांगितलं आहे. ते आज पुण्यात नाम फाउंडेशनच्या ९ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. प्रत्येक घरात पाणी पोहोचवण्यासाठी केंद्र शासन 'हर घर जल' राबवत असून पाण्याची कमतरता दूर करण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचं ते म्हणाले.

जलयुक्त शिवार योजना यशस्वी करण्यामध्ये 'नाम' फाउंडेशनचा मोठा वाटा असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

<><><><><>

येत्या डिसेंबरपर्यंत पुण्यात दीड लाख कोटी रुपयांची कामं सुरू करणार असल्याचं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितलं आहे. ते आज पुण्यात संत ज्ञानेश्वर पालखी मार्गावरच्या  दिवे घाट-हडपसर चौपदरीकरण तसंच वारजे-सिंहगड दरम्यान सेवा रस्ते आणि पुलांच्या बांधकामांचं भूमिपूजन केल्यावर बोलत होते. शेकडो वर्षांचा वारीचा इतिहास असलेल्या आळंदी-पंढरपूर आणि देहू-पंढरपूर या पालखी मार्गाची निर्मिती करण्याची संधी मिळाली, याचा आपल्याला अतिशय आनंद होत असल्याचं ते म्हणाले.

पुणे विमानतळाला संत तुकारामांचं नाव देण्याची मागणी आपण स्वत: प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडे करून त्यासाठी पाठपुरावाही करणार आहोत, असं त्यांनी सांगितलं. पालखी मार्गाचं  काम पूर्ण झाल्यानंतर विठ्ठलाच्या दर्शनाची आस

घेऊन जाणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याला दिलासा मिळेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

<><><><><>

राज्यातली ढासळती कायदा आणि सुव्यवस्था, अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचं नुकसान आदी मागण्या घेऊन काँग्रेसच्या शिष्टमंडळाने आज राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेतली. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, विधीमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा शिष्टमंडळात समावेश होता. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरोधात केलेलं चिथावणीखोर वक्तव्य, मालवणमधला छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळणं या मुद्दांकडे काँग्रेस नेत्यांनी राज्यपालांचं लक्ष वेधलं. राज्यातली कायदा आणि सुव्यवस्था बिघडली असून विधानसभा निवडणूक निर्भय वातावरणात होण्याबाबत काँग्रेस नेत्यांनी शंका व्यक्त केली. काँग्रेस नेत्यांच्या मागण्या ऐकून घेत सर्व प्रकरणात आपण स्वतः लक्ष देऊ असं आश्वासन राज्यपालांनी दिलं आहे. तसंच राहुल गांधी यांच्याविरोधात केलेल्या वक्तव्याप्रकरणी गृह विभागाकडून माहिती घेऊन कडक कारवाई करण्याचं आश्वासनही त्यांनी दिलं.

मराठवाडा आणि विदर्भातल्या सहा लाख हेक्टरवरल्या पिकांचं नुकसान अतिवृष्टीमुळे झालं. राज्यात केंद्रीय पथक अजूनही पाहणी करायला आलं नसल्याची तक्रार काँग्रेस नेत्यांनी राज्यपालांना केली.

<><><><><>

सरकारनं पुढाकार घेऊन सर्व क्षेत्रात सामंजस्य करार केले आहेत. यामुळंच राज्यात उद्योग आले. अनेक क्षेत्रात आपण प्रगती केली, त्यामुळे राज्य परकीय गुंतवणूक तसंच जीडीपीमध्ये पहिल्या क्रमांकाचं ठरलं आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं. ते आज ठाण्यात आयोजित कार्यक्रमात बोलत

होते. महाराष्ट्रातील ५२ टक्के गुंतवणूक मोठी उपलब्धी आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

<><><><><>

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांच्या पाच दिवसांपासून सुरू असलेल्या बेमुदत उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी आज जालना जिल्ह्यातल्या घनसावंगी तालुक्यात ठिकठिकाणी रास्तारोको करण्यात आले. तीर्थपुरी, बानेगाव, भोगगाव, रामसगाव इथं मराठा आंदोलकांना आंदोलन केलं. यामुळे तीर्थपुरी इथली वाहतूक काही काळासाठी ठप्प झाली होती. तर बीडमध्ये जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती.

<><><><><>

मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेची निवडणूक उद्याच घेण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं विद्यापाठीला दिले आहेत. या निवडणुकीची सर्व तयारी झालेली असताना राज्य सरकारच्या आदेशावरुन काल अचानक विद्यापीठानं ही निवडणूक स्थगित केली होती. त्याला युवासेनेच्या मिलिंद साटम, शशिकांत झोरे आणि प्रदीप सावंत यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. त्यावर न्यायमूर्ती अतुल चांदूरकर यांच्या नेतृत्वाखालील विशेष खंडपीठानं तातडीची सुनावणी घेतली आणि उद्याच निवडणूक घेण्याचे आदेश दिले.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ५ ऑक्टोबर रोजी पोहरादेवीत येणार आहेत. यावेळी त्यांच्या हस्ते बंजारा विरासत या वास्तुसंग्रहालयाचं लोकार्पण होणार आहे. पालकमंत्री संजय राठोड यांनी आज कार्यक्रम स्थळाची पाहणी केल्यानंतर ही माहिती दिली. या ठिकाणी बंजारा समाज संस्कृती आणि परंपरांचे दर्शन होणार आहे. तसंच दररोज सायंकाळी लेझर, लाईट आणि म्युझिक शो होणार आहेत.

<><><><><>

भरधाव कारने धडक दिल्याने महाविद्यालयात जाणाऱ्या तीन विद्यार्थ्यांचा आज सकाळी रायगड-कर्जत-कल्याण महामार्गावर मृत्यू झाला. याप्रकरणी नेरळ पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून कारचालकाला अटक केली आहे.

**<><><><><>**

आम आदमी पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या आतिशी यांनी आज दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांनी आतिशी आणि त्यांच्या मंत्र्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. गोपाल राय, कैलाश गेहलोत, सौरभ भारद्वाज, इम्रान हुसेन आणि मुकेश अहलावत यांनी कॅबिनेट मंत्रीपदाची शपथ घेतली.

**<><><><><>**

बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात भारतानं विजयासाठी दिलेल्या ५१५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना बांगलादेशनं आपल्या दुसऱ्या डावात तिसऱ्या दिवसअखेर ४ बाद १५८ धावा केल्या आहेत. चेन्नईच्या एम. ए. चिदंबरम मैदानावर सुरू असलेल्या या सामन्याच्या पहिल्या डावात भारतानं ३७६ धावा केल्या, तर बांगलादेशचा पहिला डाव १४९ धावांवर आटोपला होता.

**<><><><><>**

देशातून नैऋत्य मोसमी पावसाचा परतीचा प्रवास येत्या सोमवारपासून सुरु होण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांनी वर्तवली आहे.

धाराशिवमध्ये कळंब तालुक्यात भाटशिरपूरा इथं वीज कोसळून एकाचा मृत्यू झाला. परतीच्या पावसानं नांदेड, परभणी आणि धाराशिवमध्ये सोयाबीन काढणीच्या प्रक्रियेला अडथळा निर्माण झाला. सांगलीत संध्याकाळी मिरज, तासगाव, कवठेमहाकाळ, पलूस या तालुक्यात जोरदार पाऊस झाला. नांदेड शहर आणि परिसरातही आज पावसानं जोरदार हजेरी लावली.

येत्या दोन दिवसांत कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.